# मेट्रो-३ची २१६ कोटींची कमाई

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेवरील पाच मेट्रो स्थानकांच्या नावांचे अधिकार खासगी कंपनीला विकून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) मेट्रो मार्गिका सुरू होण्यापूर्वीच मोठी कमाई केली आहे. बीकेसी, सीएसएमटी, सिद्धिविनायक, चर्चगेट आणि हुतात्मा चौक मेट्रो स्थानकांच्या नावांचे अधिकार पुढील पाच वर्षांसाठी नामांकित

## पाच स्थानकांच्या नावांचे अधिकार खासगी कंपन्यांकडे

कंपन्यांना विकून एमएमआरसीला २१६ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे.

मेट्रो ३ मार्गिकेचा पहिला टप्पा पुढील वर्षी डिसेंबरमध्ये सुरू करण्यासाठी एमएमआरसीने तयारी सुरू केली आहे. या मेट्रो मार्गिकेच्या उभारणीसाठी सद्यस्थितीत ३३ हजार कोटी रुपयांचा खर्च आला आहे. तर त्यात आणखी वाढ होऊन हा खर्च ३७ हजार कोटी रुपयांवर जाण्याची चिन्हे आहेत. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी एमएमआरसीने 'जायका'कडून सुमारे १९,९२४ कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. केवळ तिकीट विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नातून या प्रकल्पासाठी उभारण्यात आलेल्या कर्जाची रक्कम फेडणे शक्य नाही. परिणामी तिकीट विक्री व्यतिरिक्त अन्य माध्यमातून मेट्रो मार्गिकेवर उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न एमएमआसीकडून सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून स्थानकांच्या नावांचे अधिकार, जाहिरातींचे हक्क, मेट्रो मार्गिकांलगतच्या जागांचा बांधकाम व्यवसायाच्या अनुषंगाने विकास साधून उत्पन्न मिळविण्यात येणार आहे. एमएमआरसीला या पाच स्थानकांच्या नावाच्या हक्क विक्रीतून वर्षाकाठी ४० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे. तसेच दरवर्षी यात ५ टक्क्यांची वाढ होणार आहे. त्यामुळे आगामी पाच वर्षांत यातून सुमारे २१६ कोटी रुपये मिळणार आहे.



### स्थानकांच्या नावाआधी कंपनीचे नाव

एमएमआरसीने पाच मेट्रो स्थानकांच्या नावांचे अधिकार विक्रीसाठी निविदा मागविल्या होत्या. त्यातील सर्वाधिक रकमेच्या निविदा दाखल केलेल्या पाच कंपन्यांना नावाचे अधिकार देण्यात आले आहेत. खासगी कंपन्यांना मेट्रो स्थानकांच्या नावाचे हक्क विक्री केल्याने आता या मेट्रो स्थानकांच्या नावाआधी संबंधित कंपन्यांचे नाव झळकणार आहे. तसेच गाडीच्या आणि स्थानकांच्या नकाशांमध्ये या कंपन्यांच्या नावाचा उल्लेख केला जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.